मा० अजीत सरदार,
युवक क्रांती दल

आपणास सप्रेम नमस्कार वि. वि.

मी आपल्या "लोक संघर्ष समिती", पाईट, ता० खेड, जि० पुणे या ऑफीस मध्ये गेलो होतो. त्या ठिकाणी मला श्री. शांताराम गोपाळे, निमगांव, आडगांव व सुरेश चिंचपाईट हे दोघेजण कार्यकर्ते भेटले. व आम्ही ऑफीस मध्ये समितीच्या कामकाजा बद्दल चर्चा केली. तर मला त्या समितीचे कार्य बरे वाटले कारण गरीब व दिन दलितांवर होणारे अन्याय अत्याचार तसेच भूमिहिनां बद्दल लाग्ग घातलेले कार्य हे फार मोलाचे व महत्वाचे आहे. म्हणून मी त्या ठिकाणी आपली कामाची फाईल व काही कागदपत्रे वाचली.

मलाही अशा संघटने मध्ये काम करण्याची फार इच्छा आहे म्हणून मी पाईट ह्या संस्थेत सभासद झालो आहे. कारण मी स्वतःही मुंबईला संघटित राहून सर्वोदय करणाऱ्या अनेक संघटने मध्ये मी काम करतो.

१) डॉ. आंबेडकर विचार मंच (२) भारतमाता बुद्ध विहार समिती (३) शिवशक्ती तरुण मंडळ, (४) डॉ. समतेवादी तरुण मंडळ, मुंबई (५) ऑल इंडिया शड्युल्ड कास्ट आणि शड्युल्ड ट्राईब्ज (२०९) इत्यादी संघटनेत मी कार्य करतो. काढू क्याचा काही तरी विकास व्हावा. म्हणून आमच्या खेड तरी समेसेवा घडावी अशी माझी इच्छा आहे. व माझ्या तालुके काही तरी मी आपल्या कुठल्याही संघर्षात हजर राहीन. व मी डाक मला कामातून वेळ मिळेल. त्याप्रमाणे मी आपल्या संस्थेत एक निष्ठ राहीन.

तरी मला आपण आपले विचार कळवावा. व आपल्याला भेटायला कधी वेळ मिळेल असे मला कळवावे. कारण पुण्याला यायला मला गाडीखर्च लागत नाही. कारण मला संपूर्ण रेल्वेचा पास आहे याबद्दल मी श्री. शांताराम गोपाळे व सुरेश पिंगे यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांनी पुढील पत्ता कळवायला सांगितला आहे तरी केव्हा आपण प्रत्यक्ष भेटू.
श्री शांताराम गोपाळे आमच्या गावच्या शेजारच्या आडगांवचा रहिवासी आहे. तरी आपण आपले विचार पत्राद्वारे कळवावे.
तसेच मी आपल्या 'घोषणा' या मासिकाचा वर्गणीदार होणार आहे. व त्याची वार्षिक फी दर १० रुपये मी त्या पत्त्यावर मनी ऑर्डरने पाठवत आहे तरी मला मासिक पाठवावे ही विनंती करावे. लोभ असावा.

आपला विश्वासू —
दादासाहेब संपत साबळे

मुंबईचा पत्ता —
दादासाहेब संपत साबळे
सेंट्रल रेल्वे कॉलनी
आर बी. वन २५१/३१
सुपारीबाग, परेळ
मुंबई- ४०००१२

गावचा पत्ता —
दादासाहेब संपत साबळे
मु० आडगांव पो० कोळी
ता० राजगुरुनगर (खेड) जि० पुणे.

मासिक व सर्व पत्रव्यवहार मुंबईच्या पत्त्यावर करावा